ग्रंथविश्व

# माझं नाव गौहरजान!

१८५० ते १९३० या काळातल्या चार 'कोठे'वाल्या स्त्रिया फार गाजल्या. कलकत्तेवाली गौहरजान, अलाहाबादची जानकीबाई व आग्रा इथल्या मलकाजान व जोहराबाई. दोघी मुसलमान तर दोघी हिंदू. 'तवायफ' या जमातीला मनोरंजनक्षेत्रात तो काळ अनुकूल होता हे खरं पण या चौघींनी मिळून सुमारे पाचशेहून अधिक गाणी ग्रामोफोन रेकॉर्ड्सवर मुद्रित करून ठेवली. गाण्याच्या सुरुवातीला किंवा शेवटी त्या आपलं नाव मोठ्यानं व ठसक्यात सांगतात. उदा. 'माय नेम इज गौहरजान..!' त्याची ऐकणाऱ्यांना मोठी मौज वाटते. या चौघींत कलकत्तेवाली गौहरजान अधिक प्रसिद्ध व मातब्बर! तिच्याविषयी तीस हजारांहून अधिक संकेतस्थळं आहेत. पण त्यातली माहिती अपुरी, अनेकदा चुकीची व विसंगतीनं भरलेली असल्याने बंगलोरच्या विक्रम संपत या तरुणानं ध्यास घेत 'माय नेम इज गौहरजान : दि लाइफ अँड टाइम्स ऑफ ए म्युझिशियन' हा ग्रंथ सिद्ध केला.

विक्रम संपत हे शिक्षणानं इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीयर. पण मन मात्र सदैव इतिहास, संस्कृती व संगीताकडे लागलेलं. अनेक विषयांवरचं स्फुटलेखन त्यांच्या नावावर आहे. २००८ साली दक्षिणेतल्या म्हैसूर शहराचा व राजघराण्याचा सहाशे वर्षांचा इतिहास त्यांनी आठशे पानी ग्रंथात मांडला व रूपा पब्लिकेशन्सनं तो प्रसिद्ध केला. त्याच वेळी म्हैसूर दरबारच्या दफ्तरातल्या गौहरजानविषयीच्या नोंदी व पत्रव्यवहार त्यांच्या पाहण्यात आला. कारण गौहरजानचा मृत्यू १९३० साली म्हैसूर दरबारच्या सेवेत असताना एकाकी अवस्थेत झाला होता. १९२० पर्यंत प्रसिद्धी व ऐश्वर्याच्या सर्वोच्च स्थानावर असलेल्या या गायिकेची अशी दयनीय अवस्था कशामुळं झाली या कुतूहलापोटी ही शोधयात्रा सुरू झाली. अनेक गौहरप्रेमींच्या निरपेक्ष सहकार्यानं हे काम पूर्ण झालं. त्या प्रवासाचा आढावा 'दि जर्नी' या लेखात सुरुवातीला येतो.



एकूण तीन विभागांत व सतरा प्रकरणांत पुस्तकाची रचना केलेली आहे. 'दि मेकिंग ऑफ ए दिवा' या विभागात बालपण, शिक्षण, जडणघडण व मिस गौहरजान या नवतारकेचा उदय; 'दि ग्लोरी इयर्स' या विभागात कीर्तीशिखरावरचा कालखंड; 'दि फॉल फ्रॉम ग्रेस' या विभागात मनस्तापाचा व एकाकी जीवनाचा समावेश आहे. परिशिष्टांतून त्यात उपलब्ध ध्वनिमुद्रिकांची शास्त्रशुद्ध यादी, विविध विषयांवरची मूळ कागदपत्रं, गौहरनं केलेल्या रचना व बंदिशी व तिच्या आईच्या पुस्तकातल्या निवडक शायरीचा समावेश आहे. दुर्मिळ अशा पन्नासेक रंगीत छायाचित्रांनी पुस्तकाचा ठेवा अमूल्य केला आहे.

गौहरजानचा जन्म आझमगढचा. मूळ नाव अँजेलिना यूवार्ड. वडील रॉबर्ट विल्यम यूवार्ड हे आर्मेनियन. आई व्हिक्टोरिया हेमिंग्ज. (व्हिक्टोरियाचे वडील ब्रिटिश तर आई रुक्मणी ही हिंदू). व्हिक्टोरियाला काव्य, संगीत व नृत्याची प्रचंड आवड. तर रॉबर्टला तितकीच नावड! त्यातूनच १८७९ मध्ये घटस्फोट झाला. खुर्शेद नावाच्या मुसलमान मित्राबरोबर दोघी मायलेकी रुक्मणीसह बनारसला आल्या. धर्मांतर करून त्याच्यासोबत राहू लागल्या. त्यानेही तिघींना भक्कम आधार दिला. आईनं मलकाजान हे नाव घेतलं तर मुलीचं नामकरण गौहरजान असं केले गेले. मलकाजाननं तवायफचा पेशा पत्करून त्यात बस्तान बसवलं. तिनं मुलीला गाणं, नृत्य व विविध भाषा शिकवण्यासाठी अनेक शिक्षक नेमले. खुर्शेदनं त्यांना कलकत्त्याला स्थलांतर करायला राजी केलं.

तिथं काही वर्षांतच मलकाजाननं आपल्या कलेच्या जोरावर ४० हजार रुपयांची हवेली खरेदी केली. नवाब वाजिद अली शाहनं मायलेकींची राजदरबारात नेमणूकच करून टाकली. १८८६ मध्ये बडी मलकाजानच्या उर्दू कवितांचा संग्रह 'मखझन-इ-उल्फत-मल्लिका' प्रसिद्ध झाला. त्यात सुमारे सहाशे रचना असून काही ठुमऱ्याही आहेत. दुर्मिळ झालेल्या या पुस्तकाची छायाप्रत लेखकानं प्रयत्नपूर्वक मिळवून त्यातल्या ७० रचना छापल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला एक कविता छापून गौहरच्या आईची स्मृती जपली आहे. खुर्शेदचा खून झाल्यावर बडी मलकाजान सैरभैर झाली. ती १९०६ पर्यंत जगली. मुलीची भरभराट व कारकीर्द तिनं पाहिली.

गौहरचा पहिला जलसा वयाच्या पंधराव्या वर्षी दरभंगा रियासतीत झाला. त्यानंतरची वीसपंचवीस वर्षे तिनं गाजवली. हिंदुस्थानभर तिचा संचार होता. अगदी दक्षिणेकडे म्हैसूर व मद्रासमध्ये तिचे जलसे झाले. अनेक संस्थानांमध्ये तिला मानाचं पान होतं, कारण तिच्या ग्रामोफोन रेकॉर्ड्स. १९०२ ते १९२० या काळात विविध ग्रामोफोन कंपन्यांकरिता तिनं दीडशेच्यावर गाणी मुद्रित केली. त्यात रागदारी व सुगम संगीत तसेच अरबी, बंगाली व इंग्लिश भाषेतल्या गाण्यांचाही समावेश आहे. या माध्यमातून तिचं गाणं राजेरजवाड्यांपासून ते सर्वसामान्य रसिकांपर्यंत पोहोचलं व ग्रामोफोन कंपनीला हिंदुस्थानात आपलं बस्तान बसवता आलं. १९०८ साली कंपनीनं कलकत्त्यास रेकॉर्ड्स छापायचा कारखाना काढला. त्याप्रसंगी तिचा खास सन्मान करून जलसा आयोजित केला होता. तिचा ध्वनिमुद्रक गैसबर्ग यानं त्याच्या पुस्तकात तिचा उल्लेख 'आर्मेनियन-ज्यूएस' असा केला असल्यानं तिची माहिती आजतागायत प्रचारात होती. प्रस्तुतच्या पुस्तकातल्या पुराव्यांमुळे तिच्या 'ज्यू'पणाविषयी शंका निर्माण झाली आहे. गौहरजानचा उल्लेख, 'हिंदुस्थानची बुलबुल : नाइटिंगेल ऑफ इंडिया' असा गोविंदराव टेंबे यांनी केला.

तिनं स्वतः काही रचनाही केल्या आहेत. 'कैसी ये धूम मचायी' व 'रसके भरे तोरे नैन' या रचना तिनं केलेल्या आहेत, याचा भल्याभल्या गायकगायिकांनाही पत्ता नाही. तिच्या काही रचनांमध्ये 'छगनपिया' असा उल्लेख येतो. बनारसचे राय छग्गन यांच्या प्रेमळ सहवासात ती काही काळ होती. तिच्या साठेक वर्षांच्या आयुष्यात चारपाच पुरुष आले, पण कुठलंच नातं फार काळ टिकलं नाही. अगदी शेवटी तिच्याहून कितीतरी तरुण वयाच्या सेक्रेटरीशी तिनं 'मुता' विवाह केला होता. पण त्यातून कोर्टकचेऱ्या व नातेवाईकांनी केलेली संपत्तीची लूट पाहणंच तिच्या नशिबी आलं.

१९०७-१० च्या सुमारास ती अनेकदा मुंबईस येऊन गेली. अंजनीबाई मालपेकर यांच्याशी तिची खास मैत्री होती. गुजराती रंगभूमीवरचे सुस्वरूप नट अमृत केशव नायक (यांच्या नावाचा रस्ता फोर्टमध्ये खादी भांडाराच्या मागच्या गल्लीत आहे) यांच्या ती प्रेमात पडली. दोन वर्षे दोघे एकत्र राहत होती. त्यांच्या पाया पडून मिळवलेला 'आन बान जिया में लागी' हा दादरा तिनं मुद्रित केला व तो अफाट गाजला. पुण्यातल्या एका मुक्कामात तिनं उस्ताद अब्दुल करीम खान यांची भेट घेऊन दुवा मागितला तर बालगंधर्वांची नाटकं पाहून 'तुम्ही तर माझ्याच रेकॉर्ड्स गाता' असं त्यांनाच सुनावलं. पुढे तिनं हिराबाईंना दत्तक घ्यायची तयारी दाखवली. छोट्या अख्तरीबाई फैजाबादी (बेगम अख्तर)चं गाणं ऐकून, ही मुलगी पुढं नाव काढेल असं भाकीत केलं. बंगालची विख्यात गायिका मिस इंदुबाला हिला तर मुलगी मानून विद्या दिली. सिद्धेश्वरी देवींसारख्या अनेक गायिकांनी तिच्या रेकॉर्ड्सनाच गुरू मानलं होतं. तीन मिनिटांत गाणं मांडायचा वस्तुपाठच अनेकांना त्यातून मिळाला.

गौहरजानच्या गाण्याचे टीकाकारही होते. १९१२ सालच्या बंगलोर इथल्या कार्यक्रमाच्या वृत्तांतात तिचं गाणं सामान्य दर्जाचं व पिटातल्या प्रेक्षकांना रिझवणारं होतं, असं म्हटलंय. विख्यात गवई पं. दिलीपचंद्र वेदी यांनी तिच्या अनेक मैफिली ऐकल्या व ख्याल गायनात ती फारशी चमक दाखवत नसे, असं मत प्रकट केलं. याउलट काश्मीरचे महाराज हरीसिंग व पं. विष्णू नारायण भातखंडे यांनी तिच्या गाण्याची स्तुती व कौतुकच केलं आहे. दतिया संस्थानाच्या महाराजांनी तिला झालेली 'ग'ची बाधा कशी उतरवली त्याचा किस्सा मुळातूनच वाचावा असा आहे.

१९२० च्या सुमाराचा कालखंड हा 'अँटी-नॉचगर्ल्स' चळवळीचा होता. दक्षिणेकडे 'देवदासी निर्मूलना'ची आघाडी उघडण्यात आलेली होती. यात गुंतलेल्या सर्वच स्त्रियांना सरसकट 'वेश्या' असं संबोधण्यापर्यंत आंदोलकांची मजल गेली होती. अशात गौहरजान विजनवासात म्हैसूर दरबारात आश्रयाला गेली. जिनं गांधीजींच्या स्वराज्य फंडाला विशेष जलसा करून भरघोस रक्कम मिळवून दिली, आलिशान बग्गीतून फेरफटका मारण्याच्या प्रमादाबद्दल रोज शंभर रुपये दंड भरला, त्या गौहरजानला मासिक पाचशे रुपयांच्या तुटपुंज्या पेन्शनवर अखेरचे दिवस काढावे लागले. शोध घेऊनही लेखकाला तिची कबर सापडली नाही. ध्वनिमुद्रिकांतून तिचा मंजुळ आवाज मात्र जपलेला आहे. गुंजत राहणार आहे.

प्रस्तुत पुस्तकाचा प्रकाशन समारंभ एप्रिलमध्ये दिल्ली येथे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांच्या हस्ते झाला. असं भाग्य क्वचितच एखाद्या पुस्तकाच्या वाट्याला येतं. गौहरजानच्या पुस्तकाच्या विमोचनाचा थाट तिच्या इतमामास साजेसा होतो आहे.

■ डॉ. सुरेश चांदवणकर
Chandvankar.suresh@gmail.com

■ माय नेम इज गौहरजान!
दि लाइफ ॲण्ड टाइम्स ऑफ अ म्युझिशियन
लेखक : विक्रम संपत;
प्रकाशन: रूपा पब्लिकेशन्स, नवी दिल्ली;
पाने : ३१८; किंमत : ५९५ रुपये.